# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- ७७-२३ दिनांक :- ०६/०३/२०२३

## ५५ लाख रुपये किंमतीचा २७५ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन (MD) अंमली पदार्थ बाळगणा-या आरोपीतांवर अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई.

मिरा- भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात होळी व धुलिवंदन सणाचे अनुषंगाने अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणा-या ईसमांविरुध्द कारवाई करण्याबाबत वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते.

मिळालेल्या सुचना व मार्गदर्शनप्रमाणे दिनांक ०३/०३/२०२३ रोजी सायं. १८.०० वाजेच्या सुमारास अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पो.नि.श्री. अमर मराठे यांचे नेतृत्वाखाली अधिकारी व अंमलदार हे मिरारोड, नवघर, भाईंदर परिसरात गस्त करीत असताना मंबईकडे जाणा-या वाहीनीवर, फाउंटन हॉटेलच्या समोरील रोडवर, घोडबंदर, काशिमीरा या ठिकाणी दोन ईसम संशयास्पद स्थितीत आढळल्याने दोन पंचासमक्ष छापा कारवाई करुन त्यांना ताब्यात घेतले. त्यांना नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्याचे नाव १) सुलतान अब्दुल कादर कारेंगल असे सांगितले. त्याचे अंगझडती दरम्यान त्याच्या कब्जात १४५ ग्रॅम व २) बाहुद्दीन निजामुद्दीन कादरी, दोन्ही राहणार मुंब्रा ठाणे याचे अंगझडती दरम्यान त्याच्या कब्जात १३० ग्रॅम वजनाचा असा एकुण २७५ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असल्याचे निदर्शनास आले. नमुद अरोपीतांविरुध्द एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८ (क), २२ (क), २९ अन्वये काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा नोंद क्र. II १६०/२०२३ प्रमाणे दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी कक्ष करत आहे.

सदरची कारवाई अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पो.नि. श्री. अमर मराठे, स.पो.नि.विलास कुटे, पो.हवा. टक्के, आव्हाड, इगंळे, ८ पाटील, सपकाळ, घरबुडे, पो. अंम. यादव यांनी केली आहे.

-----ooooo-----